# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 29/01/2024 (सोमवार) दुपार

---

### पोस्टे उमरेड हद्दीत जुगार अड्डयावर धाड

### पोलीस स्टेशन उमरेड ची कारवाई

दिनांक २८/०१/२०२४ रोजीचे १७/०० वा. ते १८/०० वा. दरम्यान आरोपी नामे (१) प्रशांत भागवत नेहते, वय ४९ वर्ष, (२) प्रफुल अशोकराव जांभुळे, वय ३४ वर्ष (३) संदिप मारोती मौदेकर वय ३२ वर्ष, तिन्ही रा. मंगळवारीपेठ उमरेड (४) विश्वनाथ चंद्रभान सदावर्ते वय ४८ वर्ष, (५) प्रशांत वामदेवराव कारगावकर वय ४० वर्ष, दोन्ही रा. जोगीठाणापेठ उमरेड (६) महेश जनार्धन निखार वय ३८ वर्ष, रा. बुधवारीपेठ उमरेड, (७) गजानन गुनवंत हंगे वय ४० वर्ष, रा. घाटाळी रोड उमरेड (८) उत्तम रामकृष्णाजी सातव वय ४७ वर्ष रा. डहाके ले आऊट उमरेड जि. नागपुर हे मौजा शेव सिल्वर ओक शाळेच्या मागे शेत शिवारात सार्वजनीक ठीकाणी बावन्न ताश पत्त्यावर पैश्याची बाजी लावुन जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांच्या कडुन एकुण नगदी ४०५८०/— रू. तसेच घटनास्थळी मिळुन आलेल्या ०६ मोटार सायकली एकुण किंमती २,२५,०००/— रु. असा एकुण २,६५,५८०/— रू. चा मुद्देमाल जप्त केला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. संदिप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी राजा पवार यांच्या मार्दगर्शानाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे, पो.उप.नि. वाघ, पो.हवा. प्रदिप चवरे, राधेश्याम कांबळे, रमेश खरकाटे, पोना पंकज बट्टे, पो.शि. गोवर्धन शहारे, नंदकिशोर शेन्डे, राजन भोयर यांनी पार पाडली.



## अपघातात मृत्यु

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा चोखाळा फाटा येथे दिनांक २८/०१/२०२४ चे १२.३० वा. ते १२.४५ वा. दरम्यान टिप्पर ट्रक क्र. एम.एच.– ४०/सि.डी.– ६६७९ चा चालक **आरोपी नामे– संदीप बंडुजी मेश्राम, वय ३५ वर्ष, रा. खेडी ता. पारशिवनी जि. नागपुर** त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवीत आणुन रोड टर्नींगवर कोणताही इशारा व इंडीकेटर न देता अचानकपणे वळण घेतल्याने फिर्यादी नामे– सौ. शितल प्रमोद शेंडे, वय २६ वर्ष, रा. खेतापुर ता. मौदा हि बसलेल्या मोटरसायकल क्र. एम.एच. –४०/डी.–६४०६ ला टिप्परचा कट लागल्याने अपघात होवुन अपघातात फिर्यादीची मुलगी कु. अन्यन्या शेंडे वय ५ वर्ष हिचे मरणास तसेच पती प्रमोद शेंडे, वय ३३ वर्ष यांना गंभीर जखमी करण्यास व फिर्यादीला व लहान मुलगा कु. तेजस वय ३ वर्ष यास किरकोळ जखमी करण्यास आरोपी ट्रक चालक कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपी ट्रक चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादंवि. सहकलम १८४, ११९ मो.वा.का. भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी ट्रक चालकास अटक करण्यात आली असुन सदर अपघात स्थळी सपोनि. निशांत फुलेकर, पोस्टे अरोली यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. निशांत फुलेकर, पोस्टे अरोली, मो. नं. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर